सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवासी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.

प्रती,                                                                                    दि.०२/०६/२०१३

मा. उपसंचालक, नगर रचना विभाग, मुंबई

एन्सा हटमेंट, इ.ब्लॉक, आझाद मैदान, मुं.१

उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचे लिपिक 3-6-13

***विषयः महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधि. १९६६, बृ.वि.नि.नि. १९९१ विनिमय ३३ (५) मध्ये कलम ३७ (१एए) अन्वये प्रस्तावित फेरबदलांवर हरकती नोंदविण्याबाबत***

***संदर्भः- सूचना क्र.टि.पी.बी. ४३१३/१२३/सी.आर ४७/ २०१३/यूडी ११.***

महोदय,

नगर विकास विभागातर्फे उपरोक्त सूचना दि. ४ मे २०१३ रोजी साधारण राजपत्रात प्रकाशित झाली आहे. सदर सूचना उशीरा जरी प्रसिद्ध झाली असली तरी २ वर्षापासून रखडलेल्या पूनर्विकास प्रक्रियेस चालना देणारी आहे. त्यामुळे सूचना जाहिर केल्या बद्दल शासनाचे आभार! आपण प्रसिद्ध केलेल्या सूचनेचे सखोल अवलोकन केल्यानंतर काही महत्वाच्या बाबी हरकतींच्या स्वरुपात मांडण्याचा येथे प्रयत्न करत आहोत.

१. ***<u>मसूदयाकरीता वापरलेली भाषाः</u>*** विविध प्रकारच्या योजना सामान्य जनते पर्यत पोहचविताना शासन सूचना, शासन निर्णय इ.च्या माध्यमातून जनतेशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत असते. उपरोक्त सूचनेचा मसूदा लिहिताना आपण



Scanned with CamScanner

वापरलेल्या भाषेची काठिण्यपातळी पाहता सर्वसामान्य सदनिकाधारकांस न कळणा-या तांत्रिक भाषेत तो मुद्दाम लिहिल्याचे जाणवत आहे. त्यामुळे आपला सभासदांच्या हिताचा प्रामाणिक हेतू मुळ लाभार्थी सदनिकाधाकांपर्यंत पोहोचनाच नाही हे येथे स्पष्टपणे नमुद करीत आहोत.

***तरी हया विषयाशी संबंधीत सर्व सूचना, शासकिय निर्णय इ. सर्वसामान्य सदनिकाधारकांस कळतील अशा भाषेत प्रसिद्ध करावेत ही विनंती. अन्यथा फक्त विकासकांच्या वास्तूविशारदांना कळतील अशा भाषेत जर संवाद साधण्याचा शासनाने प्रयत्न केल्यास तो फक्त विकासकांच्या हिताचा राहिल, सदनिकाधारकांचा नव्हे!***

२. ***<u>अनूक्रमांक २.१ मधील A-i मधील "a" घटकावरील हरकतः</u>*** आपण जारी केलेल्या सूचनेतील उपरोक्त घटकात पूनार्विकासास जाणा-या गृहनिर्माण संस्थेतील सदनिकाधारकास किमान पूनार्विकासित चटई क्षेत्र ३०० चौ.फु, अधिक त्या चटईक्षेत्रावर ३५% वाढीव चटईक्षेत्र देण्याचे घोषित केले आहे. ***सदरहू वि.नि.नि. ३३ (५) मधील पर्याय क्रमांक २ सी (i) लागू करण्याकरीता आपण प्रसिद्ध केली आहे असे आम्ही समजतो.*** परिणामी उपरोक्त २ सी (i) पर्यायावर भाष्य करताना म्हाडा प्राधिकरणाच्या मुंबई मंडळाने पारित केलेला ***ठराव क्र.६३८३ दि.२४.०२.२००९*** मधील पूनर्वसन क्षेत्र (Rehab Area) या संदर्भात गाळयांची क्षेत्रफळाची मर्यादा २७.८८ चौ.मि. अर्थात ३०० चौ.फु. देण्याचे स्पष्ट केले आहे. सदरहु ठरावास आधार मानून पूनर्वसन क्षेत्र किमान



Scanned with CamScanner

३०० चौ.फु. असावे असे आपण घोषित केले आहे, असे आम्ही समजतो. *वास्तवात वि.नि.नि. ३३ (५) कमी किमतीची घरे भागिदारीमध्ये बांधून सर्व साधरण जनतेस उपलब्ध करुन देण्याकरीता अमलात आणण्यात येते. ह्या विनिमयामध्ये अतिशय स्पष्टपणे अत्यल्प उत्पन्न गट (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG), मध्यम उत्पन्न गट (MIG) यांची व्याख्या प्रमाण माणून चटईक्षेत्राच्या, पूनर्वसन क्षेत्राच्या आकारमानाची माहिती दिली आहे. ह्या उपरोक्त घटकांच्या संदर्भात, अर्थात* **EWS, LIG, MIG** *घटकांना मिळणा-या किमान चटईक्षेत्राची मांडणी आपल्या ह्या सूचनेत करण्यात आली नाही अशी हरकत आम्ही नोंदवित आहोत.* त्या ऐवजी सरसकट किमान चटईक्षेत्रांची मांडणीकरुन संभ्रमावस्था तयार केली आहे. ठराव क्र. ६३८३ हा दि.२४.०२.२००९ रोजी पारीत करण्यात आला आणि त्यानंतर *दि.२६.०८.२००९* रोजी **शासननिर्णय** ***क्र.बैठक ११०९/प्र.क्र.३६/गृनिभू/ मंत्रालय*** नुसार विनिमय ३३ (५) अधिसूचनेच्या परिशिष्टमधील परी.४ मध्ये अत्यल्प, अल्प, मध्यम उत्पन्न गटास मिळणा-या चटई क्षेत्राची निश्चिती करण्यात आली आहे. त्यानुसार अत्यल्प उत्पन्न गटाकरीता (EWS) २७.८८ चौ.मी., अल्प उत्पन्न गटाकरीता (LIG) ४५.०० चौ.मी. आणि मध्यम उत्पन्न गटाकरीता (MIG) ८०.०० चौ.मी. चटईक्षेत्राची निश्चिती करण्यात आली आहे. परिणामी उपरोक्त शासन निर्णयाने मिळणारे लाभ सदनिकाधारकांस न देता, *सध्या सदनिकाधारक ज्या आकारमानाच्या सदनिकेत राहात आहे, त्या सदनिकेच्या चटईक्षेत्रावर ३५% वाढीव चटईक्षेत्र आपण देत आहात असे आम्ही समजतो परंतु पूनर्विकास योजनेत सभादास मिळणा-या चटई*



क.मा.प

Scanned with CamScanner

*क्षेत्राची निश्चिती गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णयाने झाली असताना त्या संदर्भात कोणताही स्पष्ट उल्लेख आपल्या सूचनेत नाही अशी हरकत आम्ही येथे मांडत आहोत.* जर तांत्रिकतेने पूर्वलक्षी प्रभावाने जूने शासननिर्णय रद्द होत असले तरी नव्याने त्याची मांडणी आपण करावी अशी मागणी आम्ही करत आहोत.

*किमान चटईक्षेत्र व त्यावरील वाढीव ३५% चटईक्षेत्र देत असताना उपरोक्त तीनही* **EWS, LIG, MIG** *घटकांना मिळणा-या किमान चटईक्षेत्राची मांडणी नव्याने करावी अशी आग्रही मागणे तमाम सदनिकाधारकांतर्फे आम्ही आपणाकडे करीत आहोत कारण विनिमय ३३(५) च्या मूळ रचनेतच ह्या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सदनिकांधारकांना मिळणारा लाभ हा निव्वळ कागदोपत्रीच राहिल. एकिकडे* **EWS, LIG, MIG** *सभादांना मिळणा-या किमान चटईक्षेत्रात घट करुन त्या ऐवजी नव्याने* **HIG** *चा समावेश ह्या विनिमयात करण्याचा आपला प्रयत्न न समजण्याएवढी जनता अज्ञानी नाही हे ध्यानी असू दयावे.*

*३. सूचनेतील अनूक्रमांक २.१ / ब (**b**) मध्ये देण्यात आलेल्या तक्ता "**A**" मध्ये पूनार्विकसीत होणा-या भूखंडाचे आकारमान व त्यावर देण्यात येणा-या अतिरिक्त चटईक्षेत्रांची मांडणी* करण्यात आली आहे. म्हणजेच योजना राबविण्यात येणा-या म्हाडाच्या संपूर्ण भूखंडाचे, वसाहतिचे, आभिन्यासाचे आकारमान गृहित धरुन अतिरिक्त चटईक्षेत्राचे (**Additional Entitlement**)



Scanned with CamScanner

वाटप करण्याचे सूचित केले आहे असे दिसते कारण म्हाडा प्राधिकरणाने वैयक्तिक गृहनिर्माण संस्थेस ४००० चौ.मी. आकारमानाचा भूखंड वितरित करणे ही अतिशय दूर्मिळ बाब आहे. तक्त्यामधील पहिल्या रकान्यात दिलेल्या आकडे वारीनुसार ४००० चौ.मी. पर्यतच्या भूखंडांवरील योजनांना कोणताही अतिरिक्त लाभ देण्यात आलेला नाही त्यावर हरकत नोंदविताना असे सूचित करावेसे वाटते की ***ज्या संस्था पूनर्विकासास तयार आहेत पण ज्यांचे भूखंडाचे आकारमान ४००० चौ.मी. पेक्षा कमी आहे त्यांना नैसर्गिक न्यायाने अतिरिक्त चटईक्षेत्राचा लाभ हा मिळालाच पाहिजे. निव्वळ त्यांचे भूखंड हे कमी आकारमानाचे आहेत म्हणून त्यांना ह्या लाभापासून अलिप्त ठेवणे अन्यायकारक आहे कृपया याची नोंद घ्यावी. जर शासनाचा तसा मानस नसेल तर उत्तमच, पण त्या बद्दल लेखी सुस्पष्टता आपल्या मसूदयामध्ये आपण आणावी अशी मागणी आम्ही करत आहोत.***

४. शेवटी ह्या सूचनेशी संबंधीत नसलेली परंतु अतिशय महत्वाची अशी एक बाब आपणा समोर मांडण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. प्राधीकरणाच्या अनेक वसाहती, अभिन्यासामध्ये अनेक गृहनिर्माण संस्था विनिमय ३३(५) मध्ये उपलब्ध होणा-या चटईक्षेत्राचा लाभ घेवुन आपला पूनर्विकास करु इच्छितात पण निव्वळ **C.R.Z.** बाधित असल्याकारणाने त्या संस्था उपलब्ध होणारे चटईक्षेत्र वापरु शकत नाहीत. वास्तविक पहाता अगोदरच म्हाडाच्या घरकुल योजना तयार होत असताना हे निकष पडताळणे गरजेचे होते परंतु केंद्र शासनाच्या सागरी नियंत्रण मसूदा २०११ अन्वये **C.R.Z.** कायदयाची नव्याने मांडणी करण्यात आलेली आहे, त्या



**क.मा.पा**

Scanned with CamScanner

सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवासी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई/ १९६६/ २०१२ जी.बी.बी.एस.डी.


अनुषंगाने ***सदरहु C.R.Z. बाधित संस्था ह्या शासनाच्याच गृहनिर्माण योजनांचा एक भाग असल्याने त्यांना विशेष लाभ देऊन त्यांचे पूनर्विकास प्रकल्प सुरु करण्याकरीता महानगरपालिका इमारत प्रस्ताव विभागास समवेत घेऊन केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण खात्याकडून मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात यावीत व त्या करीता नगरविकास विभागाने पूढाकार घ्यावा अशी आम्ही मागणी करत आहोत.***

समारोपास जाताना एवढेच नमूद करावेसे वाटते की, शासनाने आपल्या लोककल्याणकारी भूमिकेस न्याय देणारे निर्णय घेणे अभिप्रेत आहे. निव्वळ लोक प्रिय निर्णय घेण्याऐवजी सर्वसमावेश लोकाभिमुख निर्णयातुन सामान्य सदनिकाधारक व शासन यांची यशस्वी वाटचाल झाल्यास दोघांचे हित साधले जाईल अन्यथा सदनिकाधारकांना डावलून विशिष्ट व्यावसायीकांना नजरे समोर ठेवुन निर्णय घेतल्यास त्याचे दूरगामी परिणाम दोघांना भोगावे लागतील अशी भिति वाटते तरी ह्या मसूदयाचे स्वरुप, आखणी सकारात्मक करुन आपण सूर्वणमध्य साधावा ही विनंती.

***कळावे,***

***आपले विश्वासू***

***सचिव***

***सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेलफेअर असोसियेशन.***

Mobile No :- 9821727994

महाराष्ट्र राज्य, मुंबई 1966 2012 जी.बी.बी. एस.डी.
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन अंधेरी (प), मुं. ५३.



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई/ ११६६/ २०१२ जी.बी.बी.एस.डी.


म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण 12577 आवक क्र. - 3 SEP 2013 दिनांक अधिकाऱ्याची सही

दि. ३ सप्टेंबर २०१३

प्रति,

मा.श्री. सतीशजी गवई,

उपाध्यक्ष, मुख्य अधिकारी,

म्हाडा प्राधिकरण, म्हाडा भवन, बांद्रे (पू.), मुंबई.

PA TO VP/MHADA

**विषय – विनिमय ३३ (५) अंतर्गत लाभार्थी सभासदांस देण्यात येणाऱ्या पूनर्विकसीत सदनिकेचे ४८४ चौ.फु. चटईक्षेत्र देण्याबाबत.**

महादेय,

विनिमय ३३ (५) चा सुधारीत मसूदा शासनाने दि. ४ मे २०१३ रोजी प्रसिद्ध केला असून ३ FSI सह, योजनेत सहभागी होणाऱ्या सदनिकाधारकांस किमान ३०० चौ.फु. आकारमान किंवा सध्या सदनिकाधारक राहत असेल हया दाहोंपैकी जास्तीचे चटईक्षेत्र अधिक ३५% अतीरिक्त चटईक्षेत्र देण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

उपरोक्त मसूद्यावर हरकत नोंदविताना *पूनर्विकास सदनिकेचे किमान आकारमान ४८४ चौ.फु. द्यावे.* अशी मागणी आमच्या असोसिएशन सह अनेक संस्थांनी मा. उप संचालक नगर रचना मुंबई यांजकडे नोंदविली आहे.

विनिमय ३३(५) च्या अंमलबजावणी मधील पर्याय क्र. १ अन्वये प्राधिकरण ठराव क्र. ६३८३, दि. २४/०२/२००९ नूसार पूनर्वसन क्षेत्राची मर्यादा प्रती गाळा ३०० चौ.फु. अथवा अस्तीत्वातील चटईक्षेत्र यांपैकी जे अधिक असेल ते मात्र ७५०.०० चौ.फु. पेक्षा जास्त नाही अशा तत्वानूसार निश्चित करुन प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र मोजण्याचे धोरण स्पष्ट करण्यात आले आहे.

*सदर अंमलबजावणीमध्ये विनिमय ३३(५) मधील उत्पन्न गटांचा अर्थात **EWS, LIG, MIG** यांचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही परंतू शासनाच्या गृहनिर्माण विभागाने जारी केलेल्या शासन निर्णय क्र. बैठक ११०९/प्र.कृ. ३६/गृ.नि.भू. मंत्रालय, मुंबई दि. २६ ऑगस्ट २००९ अन्वये उत्पन्न गटानूसार अनूज्ञेय कमाल चटई क्षेत्राची मर्यादा स्पष्ट केली आहे.*

*विनिमय ३३(५) मधील पर्याय क्र.१ च्या अंमलबजावणीचा आधार घेतल्यास त्यातील ३०० चौ.फु. पूनर्वसन क्षेत्राची मर्यादा ही उपरोक्त शासन निर्णयानूसार **EWS** गटातील गाळेधारकांस लाभदायी आहे परंतू उपनगरांमधील विविध म्हाडा वसाहतींमधून रहात असलेल्या ६०% पेक्षा जास्त **LIG** गटातील सदनिकाधारकांस कोणताही फायदा होताना दिसत नसल्याने शासनाच्या हया कथीत धोरणास त्यांचा पाठींबा मिळणे अशक्यप्राय आहे.*

*तरी हया संबंधी आपण गांभिर्याने विचार करुन गृहनिर्माण विभागाच्या दि. २६ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयातील उत्पन्न गटांनूसार अनूज्ञेय कमाल चटई क्षेत्राची आपण अंमलबजावणी करावी अन्यथा विनिमय ३३(५) च्या अंमलबजावणी मधील पर्याय क्र.१ नूसार पूर्नवसन क्षेत्राची कमाल मर्यादा असलेले ७५०.०० चौ.फु. चटईक्षेत्र आपण लागू करावे अशी आग्रही मागणी सर्व म्हाडा वसाहतींमधील सर्व सदनिकाधारकांतर्फे आपणांस करत आहोत.*

मूळातच उत्पन्नगटांनूसार पूनर्वसनक्षेत्राची मर्यादा स्पष्ट असताना ३०० चौ.फु. चटई क्षेत्राकरीता सदनिकाधारकांनी तयार व्हावे ही प्राधिकारणाची भूमिका न कळण्यासारखी आहे !

परिणामी विनिमय ३३(५) मधील दुरुस्तीनूसार गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णयाच्या संदर्भात ४८४ चौ.फु. पूनर्वसन क्षेत्राची मर्यादा आपण लागू करावी व तसा प्रस्ताव नगरविकास विभागास पाठवावा ही विनंती.

*कळावे,*

*आपले विश्वासू*

*सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन*

अध्यक्ष सचिव खजिनदार

लिपिक महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई 3/9/13 12576

**ता.क. – सदर निवेदनासोबत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि मा. उप संचालक नगर रचना, मुंबई यांना दिलेल्या पत्रांची प्रत देत आहोत.**


संकेतस्थळ - www.svpnrwa.in

प्लॉट नं.७८/बी-१४, व.अ.साधी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.


Scanned with CamScanner

O/C

# सरदार वल्लभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य /मुंबई/ १९६६/ २०१२ जी.बी.बी.एस.डी.

दिनांक:२३/०७/२०१४

प्रति,
मा. मुख्याधिकारी (मुंबई वि. मंडळ)
म्हाडा प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व), मुबई.

अ-शाखा/मुं.इ.दु.व पु. मंडळ
मुंबई-५१

__विषय:__ __विनिमय ३३ (५) विनियम ३३ (९) अंतर्गत पूनर्विकास प्रक्रिया धोरण त्वरित लागू करण्याबाबत.__

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून सदर असोसिएशन आपल्या दप्तरी अर्ज दाखल करीत आहे. म्हाडाच्या ५६ वसाहतींच्या पूनर्विकासाचे घोडे २००८ पासून अडले आहे. विनिमयांमध्ये एक, दोन नव्हे तर तब्बल पाच वर्षात अनेक विध बदल घडवून आणण्यात आले. सुरूवातीस १००% चटई क्षेत्र प्रिमिअम स्विकारून FSI वितरीत करण्याचे धोरण नोंव्हेंबर २०१० मध्ये स्थगित करण्यात आले. सदय परिस्थिती मध्ये सहकारी संस्थांसमवेत विकासकांसमवेत भागीदारीचे धोरण अवलंबण्यात येत आहे. हे ही तसे थोडके कि, म्हाडाने अभिन्यासावरील चटई क्षेत्रामध्येही नव्याने भागीदारी करण्याचे सूतोवाच केले आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून धोरणातील अनियमिततांमुळे सदर पूनर्विकास प्रक्रियाच संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात ठप्प झालेली आहे.

*दरम्यानच्या काळात विनियम ३३(५) अंतर्गत चटईक्षेत्र संस्थांना आपण जाहिर केले. परंतु अल्प उत्पन्न गटातील (LIG) सदनिकाधारकांस ४८४ चौ.फु. चटई क्षेत्रफळाची मर्यादा असणारी तत्कालीन गृहनिर्माण सचिव यांनी जारी केलेली अधिसुचना रद्द करून तो ३०० चौ.फु. इतके केले. परिणामी तमाम LIG संवर्गातील सदनिकाधारक (ज्यांची एकुण संख्या ६०% इतकी सर्व वसाहतींमध्ये आहे.) नाराज असून आपणाकडे सातत्याने ४८४ चौ.फु. ची जुनी मागणी करत आहेत. विनिमय ३३(९) मध्येपण अशाच प्रकारची सुधारणा आपण करावी. त्यातच भर म्हणून **Additional Entitlement FSI(15%)** आपण ४०००चौ.फु. आणि त्यावरील आकारमानाच्या भुखंडावर देण्याचे प्रस्तावित केले आहे जे अन्यायकारक आहे.*

सदर त्रुटींवर पर्यायी तोडगा म्हणून *विनिमय ३३(९)* ची अंमलबजावणी उपगरांमध्येही करण्याचा निर्णय आपण घेतलात त्याबद्दल आपले अभिनंदन! परंतु *हया विनिमयांतर्गत **Additional Entitlement FSI(15%)** आपण १ हेक्टर ते २ हेक्टर इतक्या आकारमानाच्या भुखंडावर देण्याचे प्रस्तावित केले आहे ते आपण किमान ४०००चौ.मि. इतक्या आकारमानाच्या भुखंडावर प्रस्तावित करावे अशी आमची मागणी आहे.*

सदर विनिमयांतर्गत आपण ४ FSI उपलब्ध करून सहकारी गृहनिर्माण संस्थांना आकार्षित करण्याचा प्रयत्न करत आहात पण *सन २००९ पासून आजतागायत विनियम ३३(९) अंतर्गत प्रस्तावित ४८ प्रकल्पांपैकी २/३ प्रकरणेच मान्यता मिळवू शकली याचे प्रातककरण म्हणजे सदर विनिमयांतर्गत राबविण्यात*



Scanned with CamScanner

येणारी अंमलबजावणी प्रक्रिया, एकुण योजनेचे आकारमान हया दोन महत्वाच्या बाबी. तरी सदर विनिमयामध्ये असलेले १०,००० चौ.मि. अर्थात १ हेक्टर आकारमानाच्या योजने ऐवजी ४०००चौ.मि. चे विनिमय ३३(५) मधील प्रमाणे कायम करण्यात यावे. विनिमय ३३(५) प्रमाणेच विकासकास योजना थेट म्हडा प्राधिकरणाकडे सादर करण्यासाठी परवानगी दयावी जेणे करून विविध अंतर्गत समित्यांऐवजी एक खिडकी योजना राबवून योजना अंमलबजावणीचा कालावधी मर्यादित करता येईल अन्यथा भुतकाळातील अनुभव पाहता सदनिकाधारक पुन्हा विनिमय ३३(५) लाच प्राधान्य देतील यात शंकाच नाही.

प्रकल्पामध्ये उपलब्ध होणाऱ्या एकुण चटईक्षेत्रामध्ये म्हाडा भागीदारी करणार आहे. परंतु त्यामधुन अभिन्यासावर उपलब्ध होणारे चटई क्षेत्र (Pro-Rata FSI) वगळण्यात यावे अशी आमची मागणी आहे. जेणेकरून मुळ लाभार्थी सभासदास मोठया आकारमानाचे घर उपलब्ध तर होईलच पण योजना राबविणाऱ्या विकासकासही बऱ्यापैकी लाभ होईल.

एकिकडे शासनाने नुकताच मंजुर केलेल्या किमान ५०० एकरांवरील समुह झो.पु. योजनांमधून सामान्यांना परवडले असे एकही घर मिळणार नाही (२००८ ते २०१० मधील योजनांना '३–के' अंतर्गत दिलेली मंजुरी) आणि दुसरीकडे मात्र वर्षानूवर्ष विविध कर भरून पुनर्विकासाचे माफक स्वप्न पाहणाऱ्या सामान्य करदात्या सदनिकाधारकाच्या हक्काच्या चटईक्षेत्रात म्हाडा वाटा मागते हा फार मोठा विरोधाभास आम्हा सदनिकाधारकांस हताशपणे पहावा लागतोच.

तरी सदर विनिमयांची घोषणा आपण लवकरात लवकर करून पूढील किमान २० वर्षे तग धरणारे पूनर्विकास धोरण घोषित करून तमाम म्हाडा सदनिकाधारकांची प्रलंबित मागणी पूर्ण करावी हि विनंती!

आपले विश्वासू,
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन


| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. आनंद जाधव | श्री. सुर्यकांत ननावरे | श्री. अनिल परदेशी |
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |


प्रत रवाना:
मा. ना. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब,
मुख्यमंत्री तथा कॅबिनेटमंत्री, नगरविकास विभाग,
महाराष्ट्र राज्य.



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई/ ११६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.

प्रती,
मा. मुख्याधिकारी तथा उप. अध्यक्ष (पुन:विका.२)
म्हाडा मुंबई

**विषय : म्हाडा पुर्नविकास विनिमय ३३ (५) अंतर्गत अभिन्यासावर (Lay out) उपलब्ध होणाऱ्या प्रोरेटा चटईक्षेत्रात भागेदरी न करण्याबाबत निवेदन.**

महोदय,

विनिमय ३३ (५) मधील जुण्या तरतुदीनुसार २.५ चटईक्षेत्रफळाचा लाभ घेऊन मुंबई उपनगरातील बहुतांश म्हाडा अभिन्यासातून विविध सहकारी गृह संस्थाचे पुर्नविकास प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्यापैकी अनेक प्रकल्प हे अभिन्यासावरील उपलब्ध प्रोरेटा चटईक्षेत्र अधिगृहित करण्याच्या प्रतीक्षेत आहेत. दि. २१/०५/२०१४ रोजी दै. सामनामध्ये प्रोरेटा चटईक्षेत्रफळाच्या संदर्भात बातमी प्रसिद्ध झाली असून सदर चटईक्षेत्रफळामध्ये सुद्धा म्हाडाने भागीदरी करण्याचे योजले आहे, असेम्हटले आहे. जर प्रत्यक्षात असे होणार असेल तर मुंबई मंडळाने विनिमय ३३(५) चे धोरणात्मक निर्देश डावलून सदर निर्णय घेण्याचे ठरले आहे असे सकृतदर्शनी दिसते.

थोडे खोलात जाऊन तपासेल असता आपण उपरोक्त प्रोरेटा चटईक्षेत्रफळावर आपला अधिकार विनीमय २३ अंतर्गत घेतला असून म्हाडा भूखंडावर / अभिन्यासावर उपलब्ध होणा-या सर्व प्रकारच्या चटईक्षेत्रफळाचे अधिकार सर्वस्वी म्हाडाचे असतील असे त्यात नमूद केले आहे.

जागा मालक म्हणून तो म्हाडाचा अधिकार आहे असे जरी मानले तरी विनिमय ३३(५) चा सुधारीत मसूदा दि. ४ मे २०१३ रोजी जाहिर करुन त्यावरील सूनावणी घेऊन दि. ८ ऑक्टोबर २०१३ रोजी शासनाच्या राजपत्र भाग १ कोकण विभागीय पूरवणी मध्ये त्याचा कुठल्याही प्रकारचा तपशील आपण तेव्हाच का उपलब्ध केला नाही असा मूलभूत प्रश्न निर्माण होतो.

सूधारीत विनमय ३३(५) दि. ८ ऑक्टो. २०१३ मध्ये, एकून भूखंडावर उपलब्ध होणारे मूळ चटईक्षेत्र, भूखंडाच्या आकारमानानुसार उपलब्ध होणारे अतीरीक्त चटईक्षेत्र (तक्ता -ए) उपलब्ध होणारे प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र (तक्ता -बी) आणि उर्वरीत चटईक्षेत्राचे सहकारी संस्था आणि म्हाडा यांच्यात होणारी विभागणी (तक्ता -सी) स्पष्टपणे नमूद केले असून त्यावर विविध हरकती आपल्या संबंधीत अभ्यासगटांना उपलब्ध झाल्या असतीलच. परंतू एकूणच सुधारीत विनिमय ३३ (५) चा हा मसूदा बनविताना प्रोरेटा चटईक्षेत्र ह्या नावाचा तक्ता विभागणीसह आपण अंतर्भूत केला नाही ही फार मोठी तांत्रीक चूक आहे असे येथे नमूद करावेसे वाटते.

गतकाळात वारंवार सिद्ध झाले आहे की विनिमयांतर्गत कोणतीही धोरणात्मक बाब ही एखादे "धोरण" म्हणून न आखाता "प्रासंगीक" पद्धतीने हाताळली जाते जेणेकरुन धोरण हे नावापूरतेच रहाते आणि विनिमयांचा कोणताही दुरगामी लाभ ना शासनास होतो ना संबंधीत घटकास. विनिमय ३३ (५) ची दि. ६ डिसेंबर २००८ ची अधिसूचना जारी झाल्यापासून दि. ८ ऑक्टोबर २०१३ ची सूधारीत मसुद्याची अधिसूचना जाहिर करेपर्यंत अनेक विद्य बदलाव करण्यात आले. मूळ चटईक्षेत्रात बदल, अंमलबजावणी बदल, निकषांमध्ये बदल असे अनेकविद्य बदल झाल्याने सहकारी संस्थासह, विकासकही संभ्रमात आहेत आणि म्हाडालाही म्हणावातसा लाभ झालेला नाही ही सत्य परिस्थिती आहे.

संकेतस्थळ - www.svpnrwa.in

प्लॉट नं.७८/ बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई/ ११६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.


ज्या संस्थांना जूण्या धोरणांतर्गत ना हरकत प्रमाणपत्र दिले त्यांना अधिमूल्य स्विकारुन (दि. २०/०९/२०१० पर्यंत) प्रोरेटा चटईक्षेत्र द्यायायचे व सदर दिनांकानंतर झालेल्या प्रस्तावांना प्रोरेटा भागीदारी धोरण लागू करावयाचे ह्या आपल्या अंमलबजावणी सूधारीत विनिमय ३३(५) मधिल मूद्दा क्र. ९ विसंगत आहे असे येथे आम्ही नमूद करत आहोत.

तसेच सुधारीत विनिमय ३३(५) मधील मूद्दा क्र. ५ नुसार अभिण्यासावर उपलब्ध (फंजीबल व्यतीरिक्त) चटईक्षेत्रफळातील ७% रक्कम "ऑफ साईट इन्फ्रास्ट्रक्चर" नावाने सहकारी गृहनिर्माण संस्थांनी भरावयाची असून त्यापैकी ५/७ रक्कम म्हाडा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणार असे म्हटले आहे. सद्यपरिस्थिती मध्ये बहुतांश म्हाडा अभिण्यास नव्याने अंतीम करण्याचे काम महानगरपालिकेमध्ये चालू आहे. सदर अभिण्यासातील रस्ते, सार्वजनिक सुविधा भुखंड, खेळाची मैदाने, बागा इं. महानगर पालिकेकडून व्यवस्थापन केल्या जातात, तेव्हा महानगरपालिकेची या संदर्भात म्हाडा समवेत असलेली कार्यपद्धती ही सुद्धा विनिमय ३३ (५) मध्ये उल्लेखणे गरजेचे आहे.

सदर निर्णयाने एकूणच पुर्नविकास प्रक्रियेला खीळ बसणार असून मुळ लाभार्थी सभासदास मिळणा-या सदनिकेच्या आकारमानात कपात होणार असल्याने हा निर्णय आपण अमलात आणू नये अशी सर्व म्हाडा सदनिकाधारकांतर्फे आपणास आम्ही नम्र विनंती करीत आहोत. कोणतेही धोरण हे लोकाभिमूख असणे हे लोकशाहीचे अंतीम लक्ष्य आहे परंतू येथे म्हाडा निव्वळ आपला स्वार्थ तथाकथीत सवलतीच्या घरांच्या उपलब्धतेच्या नावाने साधन असून ज्यांनी वर्षानुवर्षे कर भरुन, महसूल देऊन भूखंड सांभाळले अशा सहकारी संस्थामधून रहात असलेल्या २ लाखांपेक्षा जास्त सदनिकाधारकांना गृहित धरले जात आहे ही खेदाची बाब आहे.

तरी प्रोरेटा चटईक्षेत्र हे १००% सहकारी गृह संस्थानाच मिळाले पाहिजे जेणेकरुन पुनर्विकास प्रकल्पांचा फायदा शेवटच्या सदनिकाधारकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

आपण सदर निवेदनातील बाबींचा गांभीर्याने विचार करुन मगच निर्णय द्यावा हि विनंती

कळावे.

आपले विश्वासू
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहीवासी वेल्फेअर असोसिएशन.

सचिव

**प्रत रवाणा**

मा. मुख्यमंत्री - महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई - ३२.

मा. मुख्य सचिव, गृहनिमार्ण विभाग
मंत्रालय, मुंबई - ३२

मा. मुख्य सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.


संकेतस्थळ - www.svpnrwa.in

प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई / १२६६ / २०१२ जी बी बी एस डी

25/7/14

प्रती,
मा. मुख्य सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

**विषय : म्हाडा पुर्नविकास विनिमय ३३ (५) अंतर्गत अभिन्यासावर (Lay out) उपलब्ध होणा-या प्रोरेटा चटईक्षेत्रात भागेदरी न करण्याबाबत निवेदन.**

महोदय,

विनिमय ३३ (५) मधील जुण्या तरतुदीनुसार २.५ चटईक्षेत्रफळाचा लाभ घेऊन मुंबई उपनगरातील बहुतांश म्हाडा अभिन्यासातून विविध सहकारी गृह संस्थाचे पुर्नविकास प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्यापैकी अनेक प्रकल्प हे अभिन्यासावरील उपलब्ध प्रोरेटा चटईक्षेत्र अधिगृहित करण्याच्या प्रतीक्षेत आहेत. दि. २१/०५/२०१४ रोजी दै. सामनामध्ये प्रोरेटा चटईक्षेत्रफळाच्या संदर्भात बातमी प्रसिद्ध झाली असून सदर चटईक्षेत्रफळामध्ये सुद्धा म्हाडाने भागीदरी करण्याचे योजले आहे, असेम्हटले आहे. जर प्रत्यक्षात असे होणार असेल तर मुंबई मंडळाने विनिमय ३३(५) चे धोरणात्मक निर्देश डावलून सदर निर्णय घेण्याचे ठरले आहे असे सकृतदर्शनी दिसते.

थोडे खोलात जाऊन तपासेल असता आपण उपरोक्त प्रोरेटा चटईक्षेत्रफळावर आपला अधिकार विनीमय २३ अंतर्गत घेतला असून म्हाडा भूखंडावर / अभिन्यासावर उपलब्ध होणा-या सर्व प्रकारच्या चटईक्षेत्रफळाचे अधिकार सर्वस्वी म्हाडाचे असतील असे त्यात नमूद केले आहे.

जागा मालक म्हणून तो म्हाडाचा अधिकार आहे असे जरी मानले तरी विनिमय ३३(५) चा सुधारीत मसूदा दि. ४ मे २०१३ रोजी जाहिर करुन त्यावरील सूनावणी घेऊन दि. ८ ऑक्टोबर २०१३ रोजी शासनाच्या राजपत्र भाग १ कोकण विभागीय पूरवणी मध्ये त्याचा कुठल्याही प्रकारचा तपशील आपण तेव्हाच का उपलब्ध केला नाही असा मूलभूत प्रश्न निर्माण होतो.

सूधारीत विनमय ३३(५) दि. ८ ऑक्टो. २०१३ मध्ये, एकून भूखंडावर उपलब्ध होणारे मूळ चटईक्षेत्र, भूखंडाच्या आकारमानानुसार उपलब्ध होणारे अतीरीक्त चटईक्षेत्र (तक्ता -ए) उपलब्ध होणारे प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र (तक्ता -बी) आणि उर्वरीत चटईक्षेत्राचे सहकारी संस्था आणि म्हाडा यांच्यात होणारी विभागणी (तक्ता -सी) स्पष्टपणे नमूद केले असून त्यावर विविध हरकती आपल्या संबंधीत अभ्यासगटांना उपलब्ध झाल्या असतीलच. परंतू एकूणच सुधारीत विनिमय ३३ (५) चा हा मसूदा बनविताना प्रोरेटा चटईक्षेत्र ह्या नावाचा तक्ता विभागणीसह आपण अंतर्भूत केला नाही ही फार मोठी तांत्रीक चूक आहे असे येथे नमूद करावेसे वाटते.

गतकाळात वारंवार सिद्ध झाले आहे की विनिमयांतर्गत कोणतीही धोरणात्मक बाब ही एखादे "धोरण" म्हणून न आखाता "प्रासंगीक" पद्धतीने हाताळली जाते जेणेकरुन धोरण हे नावापूरतेच रहाते आणि विनिमयांचा कोणताही दुरगामी लाभ ना शासनास होतो ना संबंधीत घटकास. विनिमय ३३ (५) ची दि. ६ डिसेंबर २००८ ची अधिसूचना जारी झाल्यापासून दि. ८ ऑक्टोबर २०१३ ची सूधारीत मसूद्याची अधिसूचना जाहिर करेपर्यंत अनेक विध बदलाव करण्यात आले. मूळ चटईक्षेत्रात बदल, अंमलबजावणी बदल, निकषांमध्ये बदल असे अनेकविध बदल झाल्याने सहकारी संस्थासह, विकासकही संभ्रमात आहेत आणि म्हाडालाही म्हणावातसा लाभ झालेला नाही ही सत्य परिस्थिती आहे.

नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई / १२६६ / २०१२ जी.बी.बी.एस.डी.

ज्या संस्थांना जूण्या धोरणांतर्गत ना हरकत प्रमाणपत्र दिले त्यांना अधिमूल्य स्विकारुन (दि. २०/०९/२०१० पर्यंत) प्रोरेटा चटईक्षेत्र द्यायायचे व सदर दिनांकानंतर झालेल्या प्रस्तावांना प्रोरेटा भागीदारी धोरण लागू करावयाचे ह्या आपल्या अंमलबजावणी सूधारीत विनिमय ३३(५) मधिल मूद्दा क्र. ९ विसंगत आहे असे येथे आम्ही नमूद करत आहोत.

तसेच सुधारीत विनिमय ३३(५) मधील मूद्दा क्र. ५ नुसार अभिण्यासावर उपलब्ध (फंजीबल व्यतीरिक्त) चटईक्षेत्रफळातील ७% रक्कम "ऑफ साईट इन्फ्रास्ट्रक्चर" नावाने सहकारी गृहनिर्माण संस्थांनी भरावयाची असून त्यापैकी ५/७ रक्कम म्हाडा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणार असे म्हटले आहे. सद्यपरिस्थिती मध्ये बहुतांश म्हाडा अभिण्यास नव्याने अंतीम करण्याचे काम महानगरपालिकेमध्ये चालू आहे. सदर अभिण्यासातील रस्ते, सार्वजनिक सुविधा भुखंड, खेळाची मैदाने, बागा इं. महानगर पालिकेकडून व्यवस्थापन केल्या जातात, तेव्हा महानगरपालिकेची या संदर्भात म्हाडा समवेत असलेली कार्यपद्धती ही सुद्धा विनिमय ३३ (५) मध्ये उल्लेखणे गरजेचे आहे.

सदर निर्णयाने एकूणच पुर्नविकास प्रक्रियेला खीळ बसणार असून मुळ लाभार्थी सभासदास मिळणा-या सदनिकेच्या आकारमानात कपात होणार असल्याने हा निर्णय आपण अमलात आणू नये अशी सर्व म्हाडा सदनिकाधारकांतर्फे आपणास आम्ही नम्र विनंती करीत आहोत. कोणतेही धोरण हे लोकाभिमूख असणे हे लोकशाहीचे अंतीम लक्ष्य आहे परंतू येथे म्हाडा निव्वळ आपला स्वार्थ तथाकथीत सवलतीच्या घरांच्या उपलब्धतेच्या नावाने साधन असून ज्यांनी वर्षानुवर्षे कर भरुन, महसूल देऊन भूखंड सांभाळले अशा सहकारी संस्थामधून रहात असलेल्या २ लाखांपेक्षा जास्त सदनिकाधारकांना गृहित धरले जात आहे ही खेदाची बाब आहे.

तरी प्रोरेटा चटईक्षेत्र हे १००% सहकारी गृह संस्थानाच मिळाले पाहिजे जेणेकरुन पुनर्विकास प्रकल्पांचा फायदा शेवटच्या सदनिकाधारकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

आपण सदर निवेदनातील बाबींचा गांर्भीयाने विचार करुन मगच निर्णय द्यावा हि विनंती

कळावे.

आपले विश्वासू
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहीवासी वेल्फेअर असोसिएशन.

सचिव

प्रत रवाणा
मा. मुख्यमंत्री - महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई - ३२.

मा. मुख्याधिकारी तथा उप. अध्यक्ष
म्हाडा मुंबई

मा. मुख्य सचिव, गृहनिमार्ण विभाग
मंत्रालय, मुंबई - ३२

संकेतस्थळ - www.svpnrwa.in

प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९९६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.


दिनांक - २८ सप्टेंबर १५

३।१०।१५

लिपिक
महाराष्ट्र गृहनिर्माण व
क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई - ५१

प्रती,

**श्री संभाजी झेंडे**
म्हाडा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी

**विषय: नियोजित ४ एफ एस आय पुनर्विकास धोरणात लाभार्थी सदनिकाधाराकास ४८४चौ फु पुनर्वसन क्षेत्र देण्याबाबत निवेदन**

महोदय

सन २०१० पासून ते आजतागायत धोरणातील सातत्यपूर्ण विसंगातींमुळे रखडलेल्या म्हाडा पुनर्विकास योजनेस चालना देण्याकरिता म्हाडा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संभाजी झेंडे यांनी ४ एफ एस आय चा प्रस्ताव राज्याच्या गृहनिर्माण विभागाच्या प्रधान सचीवाना सादर केला आहे. ह्या प्रस्तावातून शासनास ४७ हजार कोटी रुपये महसुलासह योजना उभारणारा विकासक व सामील होणारी गृहनिर्माण संस्था या दोहोंचाही लाभ होईल अशी मांडणी करण्यात आली आहे.

खेदाची बाब म्हणजे सदर योजनेत सामील होणाऱ्या सामान्य सदनिकाधारकास मिळणाऱ्या पुनर्वसन क्षेत्राची निश्चिती करण्यात आलेली नाही.

पुनर्विकासातून आपणास नवीन इमारतीमध्ये मोठे घर मिळावे असे सामान्य सदनिकाधाराकाचे माफक स्वप्न असते. सन २०१०पासुनचा एकूणच आढावा घेतला तर बनविण्यात आलेल्या प्रत्येक तथाकथित धोरणात सामान्य सदनिकाधारकास गृहीत धरल्याचेच शासकीय कागदोपत्री वारंवार दिसून आले असून प्रस्तुत असोसिअशन त्या विरोधात उभे राहिले आहे.

एकीकडे झोपू योजनांमधून सामील होणाऱ्या अनधिकृत झोपडी धारकास मिळणार्या पुनर्वसन क्षेत्रात २२५ चौ फु, २६९चौ फु ते प्रस्तावित ३०० चौ फु अशी वाढ झालेली दिसते तर अधिकृत गृहनिर्माण संस्थांमधील सर्व शासकीय, महापालिका कर भरणाऱ्या सामान्य म्हाडा सदनिकाधारकास देण्यात येणाऱ्या पुनर्वसन क्षेत्रात ४८४चौ फु ते ३००चौ फु अशी घट झालेली दिसते परिणामी म्हाडा प्राधिकरणाच्या सर्व वसाहतींमध्ये असंतोषाचे वातावरण तयार झाले आहे.

आपल्या गृहनिर्माण संस्थेची जमीन ह्या पुनर्विकास योजनेकरिता उपलब्ध करून देणारा सामान्य सदनिकाधारकच जर असंतुष्ट राहणार असेल तर सरकारी धोरण कागदावरच राहील यात शंकाच नाही.



Scanned with CamScanner

अंततः ज्या प्रमाणे ४ एफ एस आयची मांडणी करताना विकासकाची काळजी घेण्यात आली आहे त्याच प्रमाणे सामान्य सदनिकाधारकास मिळणारे पुनर्वसन क्षेत्र हे ४८४चौ फु इतके मिळालेच पाहिजे अशी आम्ही मागणी करत आहोत जेणेकरून त्याचे मोठ्या पुनर्रचित घराचे स्वप्न वास्तवात येईल.

मागील सरकारच्या मानाने आपले सरकार अधिक लोकाभिमुख आहे असे आम्ही मानतो परिणामी उपरोक्त मागणीचा समावेश नियोजित म्हाडा पुनर्विकास योजनेत आपण करावा आणि आपल्या ह्या धोरणाने सामान्य सदनिकाधाराकास "अच्छे दिन" येवोत !

कळावे

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

**प्रत रवाना:**

**मा प्रकाशजी मेहता**
गृहनिर्माण मंत्री
महाराष्ट्र सरकार

**मा रविन्द्रजी वायकर**
गृहनिर्माण राज्य मंत्री
महाराष्ट्र सरकार

**मा ना देवेन्द्रजी फडणवीस**
मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री
महाराष्ट्र



Scanned with CamScanner